भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०८/२०१७

**१) केबल वायरची चोरी . :–**

दिनांक ०४/०८/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील फिर्यादी ईश्वर इस्तारी कांबळे वय ६२ रा. मुजबी याने ईलेक्ट्रीक मोटार पंपाचा थ्रिफेश केबल वायर १५० फुट कि. २,०००/रु चा गुंडाळुन शेतातील बांधीत ठेवला आसता, यातिल संशयीत आरोपीने चोरून नेल्याचे संशयावरून फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकाने धडक देवुन औषधोपचारादरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक २४/०७/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील मृतक भुपेश हिवराज पंधरे वय २९ वर्ष रा. राजुरा जि. गोंदीया हा सायकलने साकोली वरून विरसी येथे जात असता, त्यास यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मृतकचे सायकलला धडक मारून जखमी केल्याने त्यास औषधोपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बघेल यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४(अ)(ब),१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नि. पिंपरेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) हार्टअटॅक आल्याने तरूणाचा मृत्यु . :–**

दिनांक ०८/०८/२०१७ चे १६.४५ वा. दर. यातील मृतक घनश्याम कुंडलीक हुकरे वय २६ वर्ष, रा. लोनारा हा गावातील सतिश भेंडारकर याचे पाणठेल्याजवळ बसला असता अचानक हार्टअटॅक आल्याने त्यास औषधोपचाराकरीता ग्रा.रू. पवनी येथे आनले असता तेथील डॉ. नी तपासुन मरण पावल्याने घोषीत केल्याने फिर्यादी नरेश रामराव हुकरे वय ६५ वर्ष रा. लोनारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारादरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ०६/०८/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील मृतक रशविन रंगलाल मेश्राम वय ५४ वर्ष रा. शिवनाळा याने विषारी औषध प्राशन केल्याने त्यास सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती केले असता औषधोपचारादरम्यान दि. ०७/०८/२०१७ चे १८.३० वा. मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. कागदपत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके पा.स्टे पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नंबरी नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना.राहागंडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

५) अचानक इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०८/०८/२०१७ चे १९.३० ते २२.३० वा. दर. यातील मृतक सुरेश किसन सेलोकर वय ४९ वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी हा रात्र पाळी डयुटीवर पंचायत समीती मोहाडी येथे दि. ०८/०८/१७ चे १९.३० वा. दर. हजर असतांना खुर्चीवर बसला असतांनी, तो बोलत नव्हता व नेहमी पेक्षा वेगळा दिसत होता, म्हणुन फिर्यादीने सुखदेवे साहेब यांना कळवीले त्यांनी जवळपास कोणी आहे का तेव्हा कमलेश हटवार यांना फोन द्वारे माहीती दिली तेव्हा सुरेश किसन सेलोकर याचा मुलगा राजेश सेलोकर व त्यांचे मित्र राजेश वानी यानी औषधोपचाराकरीता ग्रा.रू.मोहाडी येथे नेले असता तेथील डॉ. ने मृतक यास तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ.मेमो व फिर्यादी मानीक प्रल्हाद रामटेके वय ४२ वर्ष रा. तिलकवार्ड मोहाडी धंदा कनिष्ठ सहायक पं.स.मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०८/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०६ तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहे.

09.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.